# प्रभुतरुण

वर्ष ५० | अंक ३ | मुंबई | सप्टेंबर, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**
*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## जाहिरात

**—सुहासिनी कीर्तिकर**

सध्या उत्सवांचे दिवस आहेत. तसे मुंबईसारख्या शहरात प्रत्येक दिवसच उत्सवी असतो म्हणा! ‘हर दिन दिवाली’. सार्वजनिक उत्सवांनाही ‘नित्य आम्हा दिवाळी’ असंच वाटत असणार. म्हणजे; असे सार्वजनिक पातळीवर उत्सव करणाऱ्यांना हो! परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ, स्थानिक आणि सार्वजनिक नेत्यांचा वाढदिवस समारंभ, गटबाजीनं किंवा पक्षनिहाय घेतलेल्या विविध स्पर्धा, सार्वजनिक हळदीकुंकू, छत्रीवाटप, धान्यवाटप असे कितीतरी उत्सव-महोत्सव अवतीभवती घडत असतात. मग या सर्वांच्या जाहिरातीसाठी सर्वात प्रभावी, सर्वात सोपा अन् सर्वात ‘ताकदी’चा मार्ग म्हणजे मोठमोठे फलक (बॅनर्स) लावणे. नाक्यानाक्यावर मग ते आणखी उंच झेपावतात. दोन खांबांना दोऱ्यांच्या हातांनी धरून ते रस्तोरस्ती हिंदकळत असतात. खरं तर बसथांब्यावर अशा जाहिरातींना/ बॅनर्सना कायदेशीर बंधने आहेत. (म्हणजे आधी परवानगी काढून, जाहिरातीचे योग्य पैसे भरून ते लावावेत अशी अपेक्षा असते.) मोठमोठे बॅनर्स जेव्हा सार्वजनिक ठिकाणी तुमचे लक्ष वेधून घेतात; तेव्हाही खरं तर त्यासाठी महानगरपालिकेची संमती आवश्यक असते. पण त्या बॅनर्सवर पालिकेवर नियंत्रण असणारा, सत्ता असणाराच पक्ष असला की काय करता? बॅनर्सवरील हे सत्ताधीश ‘कार्यसम्राट’ असे पद (स्वत:च स्वत:ला बहाल केलेले!) मिरवीत असतात ना! मग काय? सार्वजनिक वा ‘पक्षीय’ सण समारंभ आला की ‘जिकडे तिकडे बॅनर्स गडे!’ काही हवेतही झेपावत असतात दुरूनही खुणावण्यासाठी. नशीब; आभाळाला बॅनर्स चिकटवण्याचा मार्मिक शोध अजून कोणी लावला नाही! तसा शोध समजा लागलाच; तर ‘भरून भरून; आभाळ भरून’ हे बॅनर्स आपल्यावर छत धरतील की हो! ‘फलाटावरील घड्याळाच्या खाली मी अमूक वाजता उभा असेन’ असा संकेत पूर्वी कादंबऱ्यांतील नायक नायिकेला द्यायचा म्हणे! आभाळ जर बॅनर्सनी भरले तर ‘अमूक अमूक बॅनरखाली मला भेट’ असा ‘एसएमएस’ जायचा भविष्यात. तिथेच का? - तर त्या ‘बॅनर’ला हवासंतुलनासाठी जे ‘डिझाइनदार’ भोक पाडले आहे; त्या ‘स्पेस’मधून उजेड इतका छान पडतो ना; की प्रेमाचा रंग अधिकच गहिरा होतो! पूर्वीच्या सिनेमातले पडद्यावरचे प्रेम झाडाखाली किंवा झाडाभोवती पळत पळत, फिरून फिरून बहरायचे. आताशा प्रेमासाठी तरी झाडंच कुठली दिसायला हो? कोठल्या कोठल्या प्रगतीशील योजनांसाठी रीतसर झाडांची कत्तल केली जातेय. शिवाय नको असलेल्या, जागा अडवणाऱ्या झाडांच्या सालांमध्ये विषारी इंजेक्शन राजरोस दिले जातेय. म्हणजे मग ती असली ‘माणूसकी’ पाहून हलके हलके मरत जातात. भविष्यात नवीन पिढीला ‘झाड’ म्हंजे दिवाणखान्यातील कुंडीची शोभा असाच अर्थ समजेल, उमगेल. हां, हां! उगाच झाडाभोवती कशाला फिरायचं? पान न् पान गळून पडलं त्याचं तरी आपण दुसरे आसरे शोधतोच ना त्याच्याजागी? म्हणून मग मूळ कल्पनेभोवती फेर धरूयात. ‘आकाशातील बॅनर्स’ची कल्पना!

या कल्पना अचाटच. पण संभवनीय बरं का. कारण जाहिरात करणं म्हणजे स्वत:ची (स्वपक्षाची) बढाई मारणं. टॉलस्टॉयनं गंमतीनं असं म्हटलंय की, ‘शब्दांचा जन्म झाला तो माणसाला बढाई मारता यावी म्हणून’ काय खोटं आहे हो त्यात? बॅनर्स, पोस्टर्स, पत्रकं आहेतच; पण त्याहीपेक्षा वर्तमानपत्रातील जाहिरातींचेही बोट धरले जातेय या बढाईसाठी. पण वर्तमानपत्र जाहिरातींसाठी का होईना; वाचावी लागतात बाबा! (आम्ही रोजचं वर्तमानपत्र घेतच नाही; अशी बढाई मारणारेही महाभाग आहेतच की) त्यापेक्षा रेडियोवर ऐकणे बरे. पण तेही चारचाकीच्या प्रवासापुरतेच. त्यापेक्षा छोट्या पडद्यावर बढाई मारणे अधिक परिणामकारक. (इथे परिणामकारक शब्द चुकला का? ‘इफेक्टिव्ह’ म्हणायला हवे होते!) सगळेजण चुंबकीय परिणामाने ‘टी.व्ही’ समोर बसतातच. मग अर्ध्या तासाची मालिका असो, तीन तासांचा चित्रपट असो, सुट्टीदिवशी असणारा मनोरंजनाचा पाच तासांचा कार्यक्रम असो; दर दहा मिनिटांनी जाहिराती देता येताहेत. दररोजची अर्ध्या तासांची एखादी मालिका (एपिसोड!) फक्त वीस मिनिटांचीच असते. ‘आम्ही परत येत आहोत’ अशी दिलासा देणारी जाहिरातीवेळची सेकंदासेकंदाची पट्टी गृहिणीला तेवढ्या वेळात भराभरा कामं उरकण्यासाठी उपयोगी पडते आपली! पण तरीही तिचेही कान त्या जाहिरातीकडेच असतात. आमची कंपनी, आमचा माल (‘प्रॉडक्ट’ हो!) अमक्या खासदार/आमदार/ कार्यकर्त्याचा वाढदिवस म्हणून तमक्याकडून शुभेच्छा... खच पडत असतो बढाई मारणाऱ्यांचा.

अरुण कोल्हटकर नावाचा गुणी कवी होता. (त्याच्या कविता मात्र अजून आहेत!) आपल्या पुस्तकांची जाहिरात नाही करायचा तो. ‘माझे वाचक मला बरोब्बर शोधत येतील’ - असा त्याला सार्थ विश्वास होता. अशीही माणसं असतात, आहेत! आपल्या भोवताली, दूर एखाद्या खेड्यात, जगाच्या एका बिंदूमात्र ठिपक्यावर... अशी अरुणसारखी माणसं आहेत. अबोलपणे आपलं माणुसकीचं काम ती करत आहेत. मानवधर्म पाळत आहेत. अखेरीस कोणत्याही इतर धर्मांपेक्षा मानवधर्मच श्रेष्ठ. तहानल्या गाढवाला पाणी पाजणारे एकनाथ तेव्हा होते अन् आता नाहीत; असं काही नाही हो! कुष्ठरोग्यांची सेवा करणारे ‘बाबा’ असतात, दलितांना माणूस म्हणून वागवणारे ‘गुरुजी’ असतात, दु:खितांना आश्रय देणाऱ्या ‘मदर’ असतात, स्त्रीयांना आत्मसन्मान मिळवून देणाऱ्या ‘ताई’ असतात. ही माणसं असतात म्हणूनच मानवी संस्कृती श्रेष्ठ ठरते. पण ती संस्कृती ठरते केव्हा? गाजावाजा न करता, जाहिरात न करता ही माणसं अबोलपणे काम करत रहातात तेव्हा. जॉन रस्किनच्या विधानाची इथे आठवण व्हावी. त्यांनी म्हटलंय - ‘आपल्याला ज्ञात नसलेल्या माणसांनीच मानवतेसाठी जास्तीत जास्त चांगल्या गोष्टी केल्या आहेत.’ ज्ञात का नाहीत? - तर त्यांची, त्यांच्या कामाची जाहिरात नाही झाली म्हणून!

चुकलंच. त्यांची जाहिरात त्यांनी वा त्यांच्या कंपूने केली नाही म्हणून. पण त्यांच्या कामाची जेव्हा महती पटली, प्रत्ययास आली तेव्हा आपोआपच ते काम सर्वतोमुखी झाले; म्हणजे खटपट्या जाहिराती न करताही त्यांच्या कामाची जाहिरात झाली की हो! अशी कामं संस्कृती घडवतात. तीच माणसं खरी ‘कार्यसम्राट’ असतात. बॅनर्सवर मिरवणाऱ्या अनेक कार्यसम्राटांनी त्यांच्या पायांचे तीर्थ घ्यावे अशा योग्यतेची असतात ती.

गंमत म्हणजे बढाईखोर,

(पान २ कॉलम १ वर)

**चतुरंग प्रतिष्ठानतर्फे डॉ. सदाशिव गोरक्षकर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला. अभिनंदन.**

संपादकीय
(पान १ कॉलम २ वरून)
आपमतलबी जाहिरातदारांना ते माहीत नसते का? माहीत असतेच हो! वरताण म्हणजे या थोर माणसांचाही ते आपल्या जाहिरातींसाठी खुबीने वापर करतात. ऋषीमुनी, साधुसंत, समाजसेवक, राष्ट्रप्रेमी, देशपुढारी, तळमळीने काम केलेले सुधारक; या सर्वासर्वांचा ते जाहिरातीत उल्लेख करतात अन् आपण त्यांची परंपरा चालवणारे पाईक अशी पुन्हा वर बढाई मारतात!

पण असो! जमाना असाच आलाय् ना! आपण आपलं हे सर्व समजून उमजून असावं हे बरं! अन् हो! आपलं काम निष्ठेने करतच रहावं. बढाई न मारता. आत्मविश्वासानं. काही दिवसांपूर्वी मला 'प्रभुतरुणा'ची संपादक म्हणून धुळ्याहून पत्र आलं. अनपेक्षितपणे. पत्र अर्थातच सुहासिनी कोठारेंच्या घरच्या पत्त्यावर आलं. कारण कार्यालयीन पत्ता तोच आहे ना! धुळ्याहून पत्र? तेथे कोण बुवा पाठारे प्रभू?... आश्चर्यच... पण पत्रलेखक 'परभू' नव्हताच. त्याच्या वाचनात 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक आला. (कसा काय? - माहीत नाही!) त्या अंकाची वाचक म्हणून त्याने वाखाणणी केली होती. हा खरा वाचक! अन् हो! ही खरीखुरी जाहिरात! कोणतीही जाहिरात न करता, निष्ठेने काम करत राहण्याला त्या वाचकाने (आधीची कधीही ओळख नसणाऱ्या वाचकाने) दिलेली ती दाद होती.

हे मी बढाई मारण्यासाठी नाही बरं का सांगितले. 'अनुभवाचे बोल' फक्त वाचकांपर्यंत पोहोचवले; एवढेच. अस्सल 'हिरा' असला की जाहिरात कशाला ना?

## घे उत्तुंग भरारी

उद्योजक मनांची पायाभरणी, सहकार्यासाठी करते सर्वांची मनधरणी
नका अंत पाहू बेकार मनाचा, वेडापिसा जीव होतो स्वत:सह इतरांच्या ही
विनाशास कारणी.
धडपडत उभा होतो उद्योगाचा डोलारा, नवयुवकास प्रेरणा आशादायी,
सोड निराशावाद मनां, घे उत्तुंग भरारी

किर्लोस्कर, दांडेकर, गरवारे, मामा काणे
दादाजी धाकजी राणे, आहेत इतरही अनेक उदाहरणे
तेव्हाही होती परप्रांतीयांची मिरासदारी उद्योगात
सदैव टांगती तलवार नोकर कपातीची,
बेकारीने कापले दोर, कसे फिरशील माघारी?
सोड निराशावाद मना, घे उत्तुंग भरारी

अजून वेळ गेली नाही. विकासगंगा हात जोडून उभी तुझ्याच दारी
मी, मी, म्हणविणारी मोठी राष्ट्रे, खुल्या अर्थव्यवस्थेच्या नावाखाली
मदत याचनेसाठी उभी विकसनशील देशाच्या दारी
''विना सहकार नाही उद्धार'' सबका साथ सबका विकास''
प्रगतीशील युगात याच मंत्राची शक्ती न्यारी
साथ तुला समाज पुरुषाची, सोड निराशावाद, घे उत्तुंग भरारी

**-अरविंद प्र. धुरंधर**

# 'प्रभु - तरुण' ९३ वा वर्धापनदिन

**- नंदकुमार कृ. विजयकर**

श्रीमती. सुहासिनी कीर्तिकर यांनी फोनवरून आम्हा उभयतांना 'प्रभुतरुणा'च्या वर्धापनदिनाचे आमंत्रण दिले तेव्हा 'आम्ही जरूर येऊ' असं म्हटलं खरं; पण २८ ऑगस्टला तिकडे जाणं जमेल की नाही; याबद्दल साशंकच होतो. पावसाचा जोर वाढला होता, शिवाय माझी स्वत:ची काही काम होती. पण त्यादिवशी आम्ही गेलो. नसतो गेलो तर एका सुंदर कार्यक्रमाला मुकलो असतो. 'मातोश्री क्लब'च्या एका आटोपशीर सभागृहात हा कार्यक्रम होता. कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत संपादक श्री. सुहास कोठारे आणि श्री. विहंग नायक यांच्या प्रतिमांच्या अनावरणाने झाली. या प्रतिमा श्री. श्रीनल कोठारे यांनी रंगीत पेन्सीलच्या सहाय्याने उत्तमरित्या रेखाटल्या होत्या. श्री. विनोद प्रधान आणि श्री. प्रदीप कोठारे यांनी अनुक्रमे सुहास कोठारे आणि विहंग नायक यांच्या प्रतिमांना हार घातले; त्यामुळे वाढदिवस खऱ्या अर्थाने सुरू झाला. संपादिका सुहासिनी कीर्तिकर यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, ''प्रभु तरुण' ९३ वर्षे पूर्ण करून ९४ व्या वर्षात पदार्पण करता झाला. पण ९३ वा वाढदिवस म्हणजे खूप वय झाले असे नव्हे. 'नको वसंता उगाच चर्चा तुझ्या वयाची, झाली घाई आता कळ्यांना फुलावयाची' असा अनुभव 'प्रभुतरुणा'ला येतोय. 'आलटून पालटून' हे सदर यावर्षी सुरू केल्यामुळे विविध लेखकांचा मोठा प्रतिसाद इतका लाभला की काही लेख, कविता चार, पाच महिने प्रकाशनाच्या प्रतिक्षेत राहिल्या. कार्यकारी संपादकांनीही आपणहून सहकार्य केले. वाचकसंख्याही चढत्या भाजणीची आहे. एक सुखद अनुभव म्हणजे धुळ्याहून एका पाठारे प्रभू नसणाऱ्या वाचकाने दिवाळी अंकाबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया पाठवली आणि स्वलिखित चारोळ्याही!'' वर्धापनदिनाच्या प्रमुख अतिथी होत्या सौ. बीना यशवंत मोडक. त्यांचा परिचय सुहासिनीबाईंनी करून दिला. दरवर्षी या समारंभात काहींचा विशेष सत्कार करण्यात येतो. यावर्षी आर्किटेक्चर-मध्ये मुंबई विद्यापीठातून पहिली आलेल्या कु. निशीता नीलेश नायक हिचा सत्कार सौ. बीना मोडक यांच्या हस्ते करण्यात आला. तिची ओळख सौ. त्वरिता दळवी यांनी करून दिली. निशिताने सत्काराला समर्पक उत्तर दिले. सौ. विदुला आणि श्री. श्रीनल कोठारे यांचाही त्यांच्या व्यावसायिक यशाबद्दल याप्रसंगी सत्कार करण्यात आला. या वर्षी 'प्रभुतरुण' बोर्डावर तीन नवीन विश्वस्तांची नियुक्ती झाली. श्री गौरांग कीर्तिकर, श्री. प्रणव देसाई आणि श्री. मिथील नवलकर या नवीन विश्वस्तांचा आणि त्यांच्या सौभाग्यवतींचा परिचय विश्वस्त श्री. बन्सी धुरंधर यांनी करून दिला आणि त्यांचे स्वागत केले. श्री. बन्सी यांनी यावेळी फार चांगला विचार मांडला की, 'प्रभुतरुण' हा 'ट्रस्ट' आहे. मासिक चालविण्यापलिकडेही या ट्रस्टला सामाजिक हिताची जाण आहे. त्या दृष्टीने नवीन आणि जुन्या सदस्यांनी पावले टाकावीत.

त्यानंतर प्रमुख अतिथी बीना मोडक यांनी प्रभावी मनोगत मांडले. 'प्रभुतरुणा'त तरुण, नवी मंडळी कार्यरत आहेत याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. 'स्वमग्नता' (ऑटिझम) या विषयावर त्यांनी फार उपयुक्त माहिती सांगत एका वेगळ्या विषयावर श्रोत्यांना विचाराधीन केले. स्वमग्नता हा मानसिक आजार नसून जन्मावस्था आहे. अशा मुलांना विशेष शाळांची गरज असते. त्यासाठी त्यांच्या पालकांनी जागरूक असलं पाहिजे. शालेय शिक्षणानंतर स्वावलंबनाचा पर्याय त्यांच्यासमोर असला पाहिजे. सौ बिना यांचा मोठा मुलगा या अवस्थेचा बळी आहे; त्यातून यावर मात करण्यासाठी त्यांनी बंगलोरला जाऊन खास शिक्षण घेतलं. टाटा इन्स्टिट्यूटचा कोर्स केला आणि पालकांना, मुलांना सोबत घेऊन 'क्षितिज' ही संस्था स्थापन केली. या कार्याबद्धल त्यांचा अनिल अवचट यांच्या 'मुक्तांगण'तर्फे 'संघर्ष सन्मान पुरस्कार' देऊन गौरवही केला गेला. या संस्थेतर्फे ही मुले विविध वस्तू बनवतात. त्या विक्रीतून त्यांना मेहनताना दिला जातो. अशा संस्था ही आजची गरज आहे... असे समर्पक विचार त्यांनी मांडले. याच 'क्षितीज'तर्फे मुलांनी केलेल्या नित्योपयोगी वस्तूंचे प्रदर्शनही याप्रसंगी मांडले गेले. या वस्तू खरेदी करून समारंभाला उपस्थित असलेल्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

'प्रभुतरुणा'च्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. बीनांच्या हस्ते केक कापण्यात आला. नेहमीप्रमाणेच या वाढदिवसा-प्रीत्यर्थ वृंदा शाम जयकर यांजकडूनही केक होता. (त्या समारंभाला उपस्थित राहू शकल्या नाहीत.) हो! तिसरा केकही होता. प्रभुतरुणाच्या कोषाध्यक्ष डॉ. सुरेखा धुरंधर यांचाही त्या दिवशी वाढदिवस होता. त्यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या आणि त्यांनी केक कापला. वाढदिवसानिमित्त अनेकांनी देणग्यांचा वर्षाव केला. त्याविषयी सौ. मिहीका नवलकर हिने माहिती दिली. विश्वस्त श्री. गुंजारव नायक यांनी आभार मानले.

या वाढदिवसाची रंगत वाढविणारा सुरेल कार्यक्रम नंतर सादर झाला. सौ. संजना कोठारे यांनी आपल्या मित्रपरिवारासमवेत 'म्युझिकल लाईफ' सुरू केलं. त्याची झलक त्यादिवशी सिनेसंगीत 'ऑर्केस्ट्रा' मध्ये पहायला मिळाली. यात सहभागी वादकांची नावे अशी-वादक - बोंगो/ तुंबा - राज अजिंक्य

तबला ढोलक/ माऊथ ऑर्गन - मोनिश शेट्ये, गिटार - सागर देवरुखकर, तालवाद्य - मयुरा नायक आणि संजना कोठारे. शिवाय ऑक्टोपॅड आणि सिंथेसायझरचीही साथ होती. सुरुवात गौरांग रातंजनकर यांच्या 'गणेश वंदना'ने झाली. शेवटची भैरवीही गौरांगनेच पेश केली. आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक पं. श्रीकृष्ण नारायण रातंजनकर यांचा गौरांग हा नातू. तयारीने गाणारा कलाकार - तेवढ्याच तयारीने इतरांनीही एकामागून एक हिंदी चित्रपटगीतांचा नजराणा दिला. प्रणेश मुरकुटे, अमोल दाभोळकर, रोनिका विजयकर, पराग साठे, सागर, कृपा पाटील, कृष्णा पाटील, निशांत पाटील आणि संजना कोठारे हे सहभागी गायक होते. मोनिश शेट्ये यांनी माऊथ ऑर्गनवर काही गाणी पेश केली. सात्विक आणि शांत असणाऱ्या रोनिकाचा सुरेल आवाज, कृष्णा पाटील यांची गझल आणि निशांतचं 'लागा चुनरीमे दाग' लाजवाबच. या कार्यक्रमाला साजेसे निवेदन होते भक्ती प्रधान शेट्ये हिचे. काही किस्से, काही कोडी, काही विशेष माहिती सांगून, प्रेक्षकांना प्रश्न विचारून तिने निवेदनात रंग भरला.

वाढदिवसाच्या या कार्यक्रमाच्या सुरुवातीला चहा/कॉफी, सॅण्डविचेस असा अल्पोपहार आणि शेवटी छोले-भटुरे आणि खिमा-पाव असा छोटा खाना असल्याने सर्व कार्यक्रमाचा श्रोत्यांनी मन भरून आणि पोट भरून आस्वाद घेतला.

'प्रभुतरुणा'च्या वाढदिवसानिमित्त एक लेखक, एक वाचक म्हणून माझ्या मनापासून शुभेच्छा.

*

लेख क्रमांक ८

## दूरदेशातून-

# हिंदुस्थानची एकता

-सुजन राणे
panditsujanrane@yahoo.com

काही विषय असे असतात की ते प्रौढांना नेहमी सतावून सोडतात. विशेषत: आपला देश सोडून अमेरिकेत जे स्थाईक झालेले आहेत त्यांना. त्यापैकी आपल्या पुढच्या पिढीचं भवितव्य, सामाजिक बदल आणि शेवटी देशाचं भविष्य हे मुख्य विषय आहेत. या वयोगटातील लोकांना त्यांचं स्वत:चं पुढचं आयुष्य मर्यादित आहे याची पूर्ण कल्पना असते, तेव्हा ते त्यांच्या परीने या बाबतीत जेवढं काही करता येईल तेवढं करण्याचा प्रयत्न करत असतात. मग त्या दिशेने काही लोक आपल्याकडील पैशाची शिल्लक, आपली मालमत्ता किंवा राष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक वातावरणात काही कार्य करण्यासाठी पावलं उचलत असतात. अमेरिकेतले भारतीय त्याला अपवाद नाहीत कारण तेसुद्धा त्या विचारसरणीतून जात असतात. त्यांना अमेरिकेतल्या तरुण पिढींच्या समस्या, स्वत:ची आर्थिक परिस्थिती व तिथलं राजकीय आणि सामाजिक जीवन किती समाधानकारक आहे ही खंत असते. पण माहिती तंत्रज्ञानाने जग लहान झाल्यामुळे इथले भारतीय हिंदुस्थानच्या भविष्याचा विचार तितक्याच आत्मीयतेने करत असतात. जरी ते शरीराने अमेरिकेत राहत असतात तरी ते मनाने व हृदयाने हिंदुस्थानातच असतात. माझे अमेरिकेतले काही मित्र हिंदुस्थानातल्या गरीब व मागासलेल्या वस्तींना वेळोवेळी पैसे पाठवत असतात, शिबिरं भरवत असतात आणि त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात मदत करत असतात. हिंदुस्थानची एकता व संस्कृती कशी टिकेल हा विषय त्यांच्या डोक्यात प्रामुख्याने घोळत असतो.

हल्लीच्या परिस्थितीत एखादं राष्ट्र त्याच्या धार्मिक किंवा भौगोलिक सीमांनी होत नाही. जगभर कित्येक राष्ट्रं त्यांच्या त्यांच्या संस्कृतीमुळे बांधली जातात. ग्रेट ब्रिटन, फ्रांस आणि जर्मनी यात नुसते ख्रिश्चन लोक नसून त्यात इतर धर्मांचे लोक कितीतरी आहेत. त्यात मुसलमान, बौद्ध व हिंदूसुद्धा बरेच आहेत. अमेरिका हा तर सर्व धर्मांच्या लोकांनी एकत्र येऊन झालेला देश आहे. तो सर्व संस्कृतींचा मेल्टिंग पॉट आहे असं म्हणावं लागेल. हे सामान्य ज्ञान आहे की इथे सर्व धर्मांचे लोक अगदी आनंदाने राहतात किंबहुना त्या सर्वांची एक अमेरिकन संस्कृती निर्माण झाली आहे. पण हे सर्व लोक एकत्र का राहतात, इथले ५२ प्रदेश धर्माच्या किंवा भाषेच्या आधारे स्वतंत्र होण्यासाठी का भांडत नाहीत, त्या बाबतीत त्यांची मनोवृत्ती संकुचित का नाही, हा विचार करण्यासारखा विषय आहे. अर्थात १८६१ ते १८६५ लढाईत काळ्या लोकांची गुलामगिरी टिकवावी की नाही या विषयावरून ह्या देशाचे दोन तुकडे होताहोता तो थोडक्यात वाचला आणि त्याचं श्रेय त्याचे राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांना जाते. त्यांच्या विचारांशी सहमत न होऊन जॉन विल्किस बूथ यांनी त्यांना एका थिएटरच्या बाल्कनीत गोळी घालून मारलं. अब्राहम लिंकनने स्वत:चं बलिदान करून अमेरिकेची एकता टिकवली. त्याच्या उलट महात्मा गांधींनी अनेक प्रयत्न करूनसुद्धा आणि शेवटी त्यांचा अशा प्रकारे अंत होऊनसुद्धा हिंदुस्थानची एकता टिकवू शकले नाहीत. हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशा दोन देशात विभागणी झाली हे दु:खदायक सत्य आहे. इतिहासाचा आढावा घेतला तर आपल्याला सापडते की मौर्याच्या साम्राज्यात म्हणजे ३२२ ते १८५ ख्रिस्तापूर्वी आणि गुप्तांच्या साम्राज्यात म्हणजे ३२० ते ५५० ख्रिस्तानंतरच्या वर्षांत हिंदुस्तानची बरीचशी एकता अखंड होती. मोगलांच्या कारकिर्दीत म्हणजे १५२६ ते १८५७ ख्रिस्तानंतर त्यांनी धर्माच्या दबावाखाली, दक्षिणेतल्या काही राज्यांव्यतिरिक्त, पुष्कळसा हिंदुस्थान एकत्र ठेवला होता. शिवाजी आणि पेशव्यांच्या २०० वर्षाच्या राज्यात म्हणजे जवळजवळ १६५० ते १८५० पर्यंत हिंदुस्थानचा मोठा भाग एकत्रित होता. पण शेवटी ब्रिटिशांनी तो काबीज करून म्हणजे १८५७ च्या बंडापासून ते १९४७ पर्यंत संबंध हिंदुस्तान त्यांच्या साम्राज्याच्या शक्तीमुळे एकत्रित ठेवला. अखंड हिंदुस्थान ब्रिटिशांपासून स्वतंत्र होण्यासाठी भांडत होता, पण देशातला एखादा प्रदेश स्वतंत्र होण्यासाठी झगडत होता असं कुठे इतिहासात नमूद केलेलं आठवत नाही. हे सत्य मान्य करावं लागेल की ब्रिटिशांनी स्वत:च्या फायद्यासाठी हिंदुस्थान एकत्र ठेवला होता, पण अभिमानाची गोष्ट आहे की सर्व हिंदुस्थानी देशाची एकता डोळ्यासमोर ठेवून ब्रिटिशांच्या विरुद्ध लढा देत होती.

तात्पर्य हे की हल्लीच्या आधुनिक जगात नुसत्या धर्माच्या आधारे देशाची आखणी होऊ शकत नाही. तसं जर झालं तर प्रत्येक देशाचे अनेक तुकडे होऊन देश ही संकल्पनाच अस्तित्वात राहणार नाही आणि जग एक जंगल होऊन बसेल. प्रसिद्ध ब्रिटीश इतिहासकार अरनॉल्ड टॉयनबी म्हणतात की हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या होऊनसुद्धा हिंदुस्तानी संस्कृती १००० वर्षांपेक्षा अधिक कशी टिकली हे एक कोडं आहे. संस्कृती अग्रगण्य असून धर्म दुय्यम आहे हे या कोड्याचं उत्तर आहे. हिंदुस्तानी संस्कृती सहिष्णू आहे म्हणून तिथे इतर अनेक धर्मांना थारा मिळाला व मशिदी, चर्चेस, अग्यारी अशी धार्मिक स्थानं बांधली गेली. ही सहिष्णुता या देशाची ताकद आहे, पण हीच सहिष्णुता देशाला शक्तिहीन करू शकते जर तिला वेळीच लगाम घातला नाही तर. हीच सहिष्णुता देशाच्या तुकड्यांना कारणीभूत होऊ शकते. अनेक वर्षांपूर्वी हीच संस्कृती पूर्वेकडे काम्बोडियापर्यंत तर पश्चिमेकडे अफघाणीस्तानपर्यंत पसरलेली होती. काम्बोडियातली देवळं आणि अफगाणीस्तानातली आता उध्वस्त झालेली बामियान बुद्धाची मूर्ती ही या संस्कृतीची प्रतिकं आहेत. वेळीच ती मजबूत करण्यासाठी पावलं उचलली गेली असती तर देशाचे तुकडे झाले नसते. १९४७ साली देशाचे हिंदुस्तान व पाकिस्तान असे तुकडे झाले. आता देशाचे आणखी तुकडे होऊ नयेत हा विचार अत्यंत त्रासदायक होत चालला आहे.


## 'प्रभुतरुणा'च्या दिवाळी अंकासाठी जाहिरातदारांना आवाहन

### जाहिरातीचे दर

| | |
|---|---|
| पूर्ण मलपृष्ठ (Back Page) | रु. १०,०००/- |
| पूर्ण मुखपृष्ठ २ व ३ | रु. ५,०००/- |
| आतील पाने | |
| पूर्ण पान | रु. ३,०००/- |
| अर्ध पान | रु. २,०००/- |
| पाव पान | रु. १,०००/- |

पानाचा आकार: १५ सेंमी. x २० सेंमी पूर्ण पान

**जाहिरातदारांनी कृपया १ ऑक्टोबरपर्यंत आपली जाहिरात द्यावी**


## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



आलटून पालटून-

## स्पेस

सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर

परवा फोन वाजला. नंबर ओळखीचा नव्हता. घेतला तर पलीकडून नेहा, माझ्या मैत्रिणीची सून बोलत होती. म्हणाली - 'मावशी मी मुद्दाम फोन केलाय तुम्हाला. मला काही सांगायचंय. वेळ आहे ना तुम्हाला? की कामात आहात?'

'नाही नाही. सांग नं' -मी उत्तरले. - 'अगदी मन मोकळेपणाने बोल.'

''मावशी, हल्ली सासूबाई आम्हा दोघांशी खूप परकेपणानं वागतायत - अभिनवचे बाबासुद्धा यांच्याशी जेवढ्यास तेवढंच बोलतायंत.''

''तुला असं का वाटलं?''

''मागच्या आठवड्यात माझं आणि अभिनवचं खूप भांडण झालं. आम्ही काही कामासाठी बाहेर गेलो होतो. तेव्हा बोलता बोलता अचानकच भांडण झालं.''

''बरं, मग?'' - मला कळेना, ही जे सांगतेय त्याचा तिच्या सासूशी काय संबंध? उर्मिलाचा बऱ्याच दिवसात फोन नव्हता आला. नाहीतर माझी खात्री आहे की, तिनं मला हे नक्कीच सांगितलं असतं.

''घरी आल्यानंतर आम्ही दोघं गप्प गप्पच होतो' नेहानं पुढे सांगायला सुरुवात केली. ''तेव्हाच काय, पण गेला आठवडाभर आम्ही दोघंही एकमेकांशी कामापुरतंच बोलतोय. पण अभिनवच्या आईबाबांनी चकार शब्दानंही विचारलं नाही की काय झालं?''

''अगं, मग तुम्ही स्वत:हून सांगायचंत की त्यांना!''

'' पण त्यांना नाही वाटत आपुलकीनं आम्हाला विचारावं असं? हे तर सरळ सरळ दुर्लक्षच झालं.''

''बरं बरं. मी विचारते तिला आणि नंतर तुला फोन करीन हं'' असं म्हणून मी संभाषण आटोपतं घेतलं आणि लगेचच उर्मिलाला फोन केला. इकडच्या तिकडच्या जुजबी गप्पा झाल्यावर मी विचारलं, ''काय, नेहा काय म्हणते? आणि अभिनव? बरे आहेत नं दोघं?''

''नाही गं. काहीतरी बिनसलंय वाटतं त्यांचं.'' उर्मिला म्हणाली.

''काय झालं?'' - मी विचारलं.

''माहीत नाही. मी काही विचारलं नाही.''

''काऽऽऽ?'' - मी आश्चर्यानं विचारलं - ''अगं, घरात मुलांचं काय बिनसलंय ते आपणच विचारायला हवं नं!''

''नाही गं बाई. आमच्याकडे नाही चालत तसं. मध्ये एकदा नेहा अशीच चिडचिड करीत होती. मी विचारलं नेहाला तर प्रथम उडवाउडवीची उत्तरं दिली तिनं. मी खोदून खोदून विचारल्यावर म्हणाली - ''तुम्ही नका पडू त्यात. आमची नवरा बायकोची भांडणं आहेत. तुम्हाला काय सांगायचं? नी सांगितलं तरी तुम्ही तुमच्या मुलाचीच बाजू घेणार. थोडीसुद्धा स्पेस देत नाही तुम्ही आम्हाला'' उर्मिलाच्या उत्तरानं मी थक्कच झाले.

थोडा वेळ इतर गप्पा मारून मी फोन ठेवला. पण नंतर सतत त्या दोघींचं बोलणं मनात घुमत राहिलं. एक गोष्ट लक्षात आली; ही स्पेसची मारामारी होती तर!

हल्ली जिथं तिथं हेच ऐकू येतंय - 'स्पेस हवी' किंवा 'स्पेस द्यायला हवी' पण ही स्पेस म्हणजे नेमकं काय हो? स्वातंत्र्य? आत्ताच याची 'गरज' का वाटायला लागलीय? पूर्वीपासून आमच्या पिढीला होतं की हे स्वातंत्र्य. आमच्या मागच्या पिढीलाही आमच्याशी वागताना हे स्वातंत्र्य होतंच - कुणीही कुणाकडेही न मागताच मिळालं होतं ते. घरात मनमोकळेपणा होता. अगदी भांडणांचासुद्धा. भांडणं घरची माणसं आनंदानं सोडवीत असत. क्वचित मित्रमैत्रिणींचेही सल्ले घेतले जात. नवराबायकोमध्येसुद्धा मतांची लपवाछपवी नव्हती. आमच्या पिढीनं बहुतेक निर्णय नवरा बायकोनं चर्चा करूनच एकमतानं घेतलेले किंवा घरच्या माणसांच्या सहकार्यानं घेतलेले असत. एकमेकांचे सल्ले विचारले जात. पण लादले जात नसत. आता तर असे निर्णय दुसऱ्यावर 'लादण्याचा' विचारही कुणाच्याही मनात नसतो. आणि तरीही प्रत्येकाची तक्रार 'स्पेस मिळत नाही' हीच असते.

पण नेहा तर नवीन पिढीमधली. तिला व तिच्या नवऱ्याला तिचे सासू सासरे स्पेस देतायत. त्यांचं मन शांत होऊन स्वत:चे प्रॉब्लेम्स किंवा आपापसातली भांडणं सोडवायला वेळ देतायत; तर नेहाला तेही आवडत नाहीय. म्हणजे 'स्पेस'चा अर्थ ती 'दुर्लक्ष' असा लावतेय. म्हणजे मग नेमकी स्पेस किती द्यायची, कधी द्यायची, द्यायची की नाही, घेणाऱ्यानं ती घ्यायची की नाही की तिला दुर्लक्ष मानायचं हे गणित कोण सोडवणार? कारण या गणिताची पुन्हा प्रत्येकाची रीत वेगळी आणि त्यामुळं मिळणारं उत्तरही वेगवेगळंच.

नेहाच्या मनानं ते दुर्लक्ष होतं. आणि अगोदरच्या प्रसंगामधलं उर्मिलाचं विचारणं नेहाला तिच्या स्वातंत्र्यावरचा 'स्पेस' वरचा घाला वाटत होता. आता नेहाला सासू सासऱ्यांच्या आपुलकीची तहान लागली होती. पण जेव्हा सासूनं स्वत:हून आपुलकीनं विचारलं होतं तेव्हा ते तिला कळलं नव्हतं? की तेव्हा ती आपुलकी तिला नको होती? आता हे ठरवायचं कसं की दुसऱ्याला आपुलकी कधी हवीय ते? की दुसऱ्याला आपुलकीनं विचारायचं. त्यानं ती लक्षात घेतली तर ठीक; नाहीतर झिडकारायला, फटकारायला ते मोकळे! सोशल मिडियावर गळे काढून घरच्यांच्या तक्रारी अनोळखी लोकांकडेही नवीन पिढी करते (सगळेच तसं करीत नाहीत हं!) तेव्हा त्यांची स्पेसची तहान कुठे जाते?

खरं तर पुढच्या पिढीनं सल्ला मागितला तरच द्यावा; हा सल्ला आमच्या मागच्या पिढीनं आम्ही न मागताच अनाहूतपणे आम्हाला दिला (आणि तसे 'सल्ले' एकमेकांकडे मनमोकळेपणानं मागितले जात किंवा एकमेकांना दिले जात.) पण आता त्यासाठी समोरच्यानं तोंड तर उघडायला हवं. दुसऱ्याच्या मनातलं कळणार कसं? दुसऱ्याला नेमकी किती स्पेस कधी द्यायची हे कळणं शहाणपणाचं हे ही बरोबर आहे. पण ही शहाणपणाची वेस ठरवायची कुणी नी कशी? हे तर व्यक्तिसापेक्ष आहे. म्हणजे आता आपल्या दुसऱ्या बद्दलच्या अपेक्षा बदलल्यात की काय? की वाढल्यायत?

एवढे नवनवीन शोध लागतायत. त्यात हे दुसऱ्याच्या मनातले विचार ओळखण्याचं यंत्र कुणी शोधलं तर घरोघरची अशी पेल्यातली क्वचित मोठी होऊ पाहणारी वादळं नक्कीच शमतील. आता 'मनकवडेपणा' ही खूपच मोठी गरज बनलीय. सगळंच ऑनलाईन, एका क्लिकवर मिळत असण्याच्या या काळात मन ऑनलाईन कधी 'क्लिक' होणार आणि इंटरनेटच्या फास्ट '(आणखी फास्ट)'च्या जमान्यात कधी चटकन ओपन होणार?

माझ्या या सगळ्या विचारांना तुमच्या मनात 'स्पेस' देताय ना?

*

लेख क्रमांक ६

## अनुवाद-संवाद

-सौ. कल्पना सुभाष कोठारे

| **Dawn to Dusk**<br>by - **J. R. Kokandakar** | **उषा ते संध्या** |
|---|---|
| Birth takes place when<br>The world welcomes you and<br>The womb says goodbye | होतो जेव्हा जन्म<br>जग करते स्वागत<br>गर्भ घेतो निरोप |
| childhood runs when<br>Tables welcome you and<br>The abacus says goodbye | बालपण दुडुदुडु धावतं<br>परीकथा करतात स्वागत<br>ओनामा घेतो निरोप |
| Adolescence peeps when<br>The perception welcomes you<br>And the innocence says goodbye | किशोरपण हळूच डोकावतं<br>जाणीव करते स्वागत<br>निरागसपण घेते निरोप |
| The youth blossoms when<br>The knowledge welcomes you<br>And the ignorance says goodbye | तारुण्य उमलत जातं<br>ज्ञान करतं स्वागत<br>अज्ञान घेते निरोप |
| The old age creeps when<br>The reminiscences welcome you<br>And the future says goodbye | वार्धक्य येऊन गाठतं<br>तेव्हा स्मृतीचं स्वागत<br>भविष्य घेते निरोप |
| And death strikes when<br>The good bye welcomes you<br>And welcome says good-bye! | मरण उभं ठाकतं<br>करतो निरोप स्वागत<br>अन् स्वागत घेतं निरोप! |

(From Bhartiya Vidya Bhavan's Journal, June 15th, 2008)

### पाठारे प्रभु चॅरिटीज

चॅरिटीजच्या नवीन प्रथेप्रमाणे जुलैमध्ये 'न्यूजलेटर' प्रसिद्ध जाले. ते 'न्यूजलेटर' असले तरी मुखपृष्ठावर 'न्यू लेटर' छापलेले आहे. असो. ते 'न्यूलेटर' ही आहेच म्हणा! या पुस्तिकेत वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त, आर्थिक कार्यवाही, डॉ. अरुण जयकरांवर 'डॉक्टरकीची ५८ वर्षे' हा सन्मान-लेख, श्री. सुबोध आनंदराव धैर्यवान यांच्या मृत्यूसंदर्भात छायाचित्रांसह विशेष लेख आणि चॅरिटीजच्या कार्यक्रमांविषयीची नोंद घेणारी छायाचित्रे असा परिपूर्ण मजकूर आहे.

The challenge of

# REVENUE MANAGEMENT TODAY

*A holistic approach to revenue management is critical in todays competitive era in which most micro-markets have excess capacity. Hence there is a need to manage hotels effectively with a revenue-centric approach.*

**-MILIND KOTHARE**




Revenue management is generally co-related and pursued as effective management of

online travel agents, meaning optimising business generation from online travel agents. This belief comes from the thought process in the West as, for them, around 80 per cent of the business is generated through online channels but, in the Indian context, this varies from 19 per cent to 25 per cent, as mentioned by **Tarun Joukani**, Director, STAAH, based on users data.

In hotels with sales and marketing teams the corporate segment (CVGR) contributes around 50 per cent or more volumes and managing yield and improving year-to-year yields requires a more holistic approach to revenue management.

A true challenge is faced by sales and marketing teams to convince corporate bookers over dynamic online travel agency (OTA) rates.

**PROCESS OF REVENUE MANAGEMENT IN HOTELS**

The process of revenue management begins with data mining. Here data mining means a huge amount of data collection and its storing in a scientifically structured manne—data which can be retrieved easily and can be used as inputs for forecasting and optimising.

The challenge is correctly compiling guestwise data for a number of years to create a historicic database. This can be retrieved for forecasting and optimising as explained in the diagram given along side. In reality, the volume of data is very large and hence it requires sophisticated software and statistical tools to store and manage.

Revenue managers interpret reports and take revenue optimising decisions based on this data. This data then again goes back in to historic data. This is the backbone of the revenue management software. Accurate forecast data becomes the base for preparing scientifically accurate budgets which is the base of the revenue management system.

The budgetary control process, with monthly monitoring and analysis of the variances with the cause-effect relationship and corrective action helps generating optimum revenue by the end of the fiscal year.

**CHALLENGES FACED BY SMALLER HOTELS TODAY**

Quality revenue management software is clearly beyond the reach of smaller hotels in terms of viability. There can be some practical alternatives which may not be as sophisticated but can be useful to smaller hotels but such a software development initiative needs to be taken jointly by hoteliers and property management software companies.

**REVENUE MANAGEMENT— A TEAM GAME**

There is a lack of availability of trained managers fitting into the revenue management culture.

The success of revenue management depends on adopting a revenue-centric culture in an organisation.

This demands the acceptance of the importance of revennue management and the adoption of revenue management principles by the top management. It means the support and allocation of resources required for it being provided by the top management.

Revenue management is not just a revenue manager function but there is a need to make the entire organisation revenue-centric. The revenue manager monitors various parameters and take calls on strategic decision on rates and inventory allocation but that does not mean revenue optimisation. Each and every team member is responsible for optimising revenue. Consider the following examples:

* A bell desk member, while escorting a guest into the room, apart from explaining features, needs to elaborately explain the mini-bar and snacks kept and can also explain the USP of in-room dining.
* Similarly, a housekeeping team member serving the room can remind the guest of ice and drink in the evening.
* A food and beverage team member needs to conventionally up-sell menus and invite repeat visits of a loyal guest by warmth of service.
* A front office team member can up-sell a higher category of rooms or convince a guest to buy allied services like the travel desk and car rentals from which hotels make some revenue too.

This is how the entire team can contribute to revenue pool.

**NEED TO DEVELOP A REFRESHERS SCHOOL**

Today there is need of highly trained manpower to optimise revenue, specially in the middle management category which includes lobby managers, restaurant managers, front office managers and food and beverage managers

Today there is attrition in the industry due to frustration from lack of growth and less compensation. As there is no platform which guides managers and helps them to hone managerial skills, they need guidance and upgradation of managerial skills.

I have designed various programmes covering critical managerial functions in rooms division as well as in food and beverage which can be covered in ten modules in five sessions each. These programmes are really useful for the participants but the challenge is that our technical boards do not approve programmes which are less than six months in duration.

Hence my appeal to FHRAI to approve such programmes with certification and invite various institutes to conduct them on a pan-India basis.

---

## ''पोरी''

थांब थांब पोरी मागे वळून पाहा,
आर्त नेत्रांनी तव हा पिता बोळवण तुझी कशी करतो पाहा.
पोरी आजही माझ्या स्मृतीत आठवते तव छबी चिमुरडी,
अंगणी तुझ्यासवे खेळे मी भातुकली, उड्या अन खेळणी.
हट्ट लटका तुझा पुरविता तृप्त होई मी मनोमनी,
आईकडे, तुझी तक्रार ऐकूनी परिपूर्ण होई मी या जीवनी.
अचानक वर्षे ही कशी सरली पडले मज आज ते कोडे,
विवाहवेदीवर तुज पाहता मिश्र भावना लोचनी उमडे.
संतुष्ट आहे मनी मी वाहुनी पित्याच्या जबाबदारीचे ओझे,
परि रिता राहतो कोपरा तो मनी वियोगाच्या तुझ्या अनामिक ओढे.
आशीष माझा लाभो सदा तुज सुख समृद्धी अन् सुबत्तेचा,
परि विसरू नको या पितृसख्यास निमित्तस्वार्थ हा तव पित्याचा.

**-हेमंत विनायकराव तळपदे**

---

## कावळे कावले

**-नंदकुमार कृ. विजयकर**

कावळे कावले, उकीरडे फुंकून
तीच ती घाण, खरकट्याला उधाण

कुणीतरी कावला, बस्स झालं कदान्न
मिळेल का कधी, गोड पक्वान्न

म्हातारे काकोबा, बोलले फिरवून एकाक्ष
धीर धरा, येतोय आता पितृपक्ष

पितरं उतरतील यांची, खाली आता
श्राद्ध घालतील येता जाता

पिंडाला शिवला कावळा, समाधानी मन्मनी
करू मजा, झोडू चांगली मेजवानी

म्हणतात कावळ्याच्या शापाने, मरत नाही ढोरं
आम्हीही म्हणू शकतो, मरोत यांची पितरं

## PICNIC

**-Sheela Mukund Kothare**

Pationtly waiting for the Day
Indeed, heard `voice' wake away
Come, it is time for bus to start,
Now join us quick, be smart
I opened my eyes, saw beautiful sight
Came to know oh! it was just a mid-night

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

**'प्रभुतरुणा'च्या वर्धापनदिना-निमित्त प्राप्त झालेल्या देणग्या**

✶ सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकर यांजकडून लीला मोरोबा विजयकर आणि मोरोबा वमानराव विजयकर यांच्या स्मृत्यर्थ रु. ११,०००/-

✶ डॉ. सौ. सुरेखा बन्सी धुरंधर यांजकडून रु. २,५००/-

✶ श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून रु. २,०००/-

✶ सौ.नीलन आणि श्री. दीपक एम. धैर्यवान यांजकडून रु. १,००१/-

✶ कु. मान्या मिथील नवलकर-कडून रु. १,००१/-

✶ कु. इशान आणि कुमारी निष्का दीपक कोठारेकडून रु. १,००१/-

✶ सौ. शोभना आणि श्री. उदय बी. जयकर यांजकडून रु. १,०००/-

✶ श्रीमती वृंदा शाम जयकर यांजकडून रु. १०००/- आणि दरवर्षीप्रमाणे केक

✶ सौ. अनिला आणि श्री. विराग धैर्यवान यांजकडून रु. १,०००/-

✶ सौ. बागेश्री आणि श्री. योगेन पारेख यांजकडून रु. १,०००/-

✶ कु. निशीता नीलेश नायककडून रु. १,०००/-

✶ डॉ. श्रीमती मीनाक्षी शिवनाथ देसाई यांजकडून रु. ५०१/-

✶ सौ. सुहास आणि श्री. नंदकुमार के विजयकर यांजकडून रु. ५००/-

✶ सौ.सुरेखा आणि श्री. प्रदीप एस् कोठारे यांजकडून रु. ५००/-

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

✶ सौ. अर्चना अभ्युदय लेले (पूर्वाश्रमीच्या कु. अर्चना प्रमोद नवलकर) यांजकडूनकन्या कु. आयुषा अभ्युदय लेले हिला दहावीच्या परीक्षेत ९१ टक्के मिभाब्याबद्दल रु. २५१/-

सर्वांचे मन:पूर्वक आभार.

## अभिनंदन

✶ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'वजनदार' या पुस्तकाला पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदे पाठोपाठ कोल्हापूरच्या 'बालरंजन साहित्य मंच' या संस्थेचा पुरस्कार लाभला. अभिनंदन

✶ 'प्रभुतरुण'च्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांना उरणच्या 'आनंदी अण्णा पानसरे फाऊण्डेशन ट्रस्ट' तर्फे साहित्य क्षेत्रातील कामाबद्दल पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते सुवर्णपदक प्राप्त झाले.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या संदर्भ विभागासाठी सहा सभासदांची नवीन समिती नेमण्यात आली. विद्यापीठांतील मराठी विभाग प्रमुखांसह असलेल्या या सभासदात त्यांचा समावेश आहे.

'ग्रंथाली' तर्फे साहित्योत्सव साजरा होणार आहे. त्यात निमंत्रित सल्लागार म्हणून त्यांना विचारविनिमय बैठकीसाठी बोलावण्यात आले.

'दादर भगिनी समाजा'त त्याचे 'लोकमान्य आणि लोकशक्ती'वर व्याख्यान झाले.

एस.एन.डी.टी. विद्यापीठासाठी 'माझी जन्मठेप' वर त्यांची व्याख्याने झाली. त्याचे विद्यार्थीनींकरीता अभ्यासलेखनही त्यांनी केले.

मुंबई मराठी साहित्य संघात झालेल्या 'स्मृतिसोहळा' कार्यक्रमात डॉ. अरुण टिकेकरांवर त्यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या आयोजनातही त्यांचा सहभाग होता.

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला सामाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ ऑगस्ट २०१६ रोजी समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता मिलिंद सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सूचना परिपत्रकातील सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. श्री. शशांक गोखले यांची नवीन लेखा परीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. तसेच कै. डॉ. सुनिल राणे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या विश्वस्तपदी श्रीमती स्वाती तारकनाथ जयकर यांची निवड करण्यात आली. नंतर माजी लेखा परीक्षक यांनी ३५ वर्षे समाजासाठी कार्य केल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ, मिठाई, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी महिला समाजाला शिक्षणासाठी रु. १०,०००/- ची देणगी दिली.

त्या दिवशी घेण्यात आलेल्या संगीत व नृत्यस्पर्धांचे निकाल.

संगीत स्पर्धा (महिला)
१) क्रमांक : श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे,
२) क्रमांक : सौ. वैदेही राकेश राणे
३) क्रमांक विभागून - सौ. स्वप्ना विनीत जयकर, श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
मुली (१) क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
(२) क्रमांक - कु. आदिती आशिष व्यवहारकर
समाज प्राईज (महिला) - सौ. रजनी नितीन कोठारे
नृत्य स्पर्धा (मुली) (१) क्रमांक - कु. आदिती आशिष व्यवहारकर
(२) क्रमांक - कु. तनया दीपक धराधर
(३) क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
मुले (१) क्रमांक - कु. वरुण राकेश राणे
(महिला) (१) क्रमांक - सौ. वैदेही राकेश राणे
(२) क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
उत्कृष्ट नृत्याविष्कार - कु. आदिती आशिष व्यवहारकर
उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक - सौ. सोनल पाष्टे
नृत्याचे परीक्षक - कु. उर्मिन बॉबी विजयकर
संगीताचे परीक्षक - सौ. मंगला नाथ

रविवार, दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी कोजागिरी निमित्त मुंबई दर्शन सहल काढण्यात येणार आहे. बोरीवलीहून दु. १ वाजता बस सुटेल व वाटेत प्रमुख बस थांब्यावर बस थांबेल. कमला नेहरू पार्क, मत्स्यालय, गेटवे ऑफ इंडिया, चौपाटी अशा स्थळांना भेट देण्यात येणार आहे. दुपारचा नाश्तापाणी व रात्री ८ वाजता जेवण देण्यात येईल. सहलीची वर्गणी रु. ७००/- फक्त. त्वरा करा. मर्यादित जागा.

शनिवार, दि. २२ ऑक्टोबर २०१६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १०.०० पर्यंत पा. प्र. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) येथे ज्ञातीय बंधु भगिनींसाठी विनामूल्य 'दांडिया' कार्यक्रम आयोजित केला आहे. त्या दिवशी महिला सभासदांसाठी पाकसिद्धी स्पर्धा घेण्यात येईल. दुधी हलव्याच्या बिरवणीसह ५ शिंगड्या घरून करून आणणे. मुलींसाठी चायनीज भेळ घरून करून आणणे.

गुरुवार, दि. २० ऑक्टोबर २०१६ रोजी समाजाच्या शिवणवर्गात सायंकाळी ५ वाजता दिवाळीनिमित्त गरजू भगिनींना लुगडी वाटप करण्यात येईल. तरी गरजू भगिनींनी आपले अर्ज दि. ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत संयुक्त चिटणीस सौ. रश्मा विजयकर, १९ सेठ ब्लॉक्स, नवरोजी स्ट्रीट, ठाकुरद्वार, मुंबई - ४००००२. यांच्याकडे आणून द्यावेत.

टेलिफोन : (२२०१३८८३) / (९८२०९८१८८२)

✳

✶ २१-८-१६ रोजी दिल्लीला इंडिया गेट येथे 'भारतपर्व' अंतर्गत 'आझादीसे आझादी तक' हा भव्य कार्यक्रम झाला. त्याची प्रकाशयोजना शीतल तळपदे यांची होती. अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २१ ऑगस्ट २०१६ रोजी प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, ठाकुरद्वार येथे सायंकाळी गणसंख्येच्या अभावी सायंकाळी ५.३० वाजता समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेत सूचना परिपत्रकातील सर्व मुद्दे एकमताने मंजूर करण्यात आले.

समाजाच्या पुढील कार्यक्रमानुसार २० नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सोशल समाज व हौशी कला मंदीर यांच्या संयुक्त विद्यमाने कॅरम व बेझीकचे सामने खार येथील पा. प्र. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात घेण्यात येतील.

४ डिसेंबर २०१६ रोजी समाजाच्यावतीने बोरीवली येथील नॅशनल पार्कमध्ये 'नॅशनल नेचर ट्रेक'चे आयोजन केले आहे.

११ डिसेंबर २०१६ रोजी दिवाळीनिमित्त खार येथील पा. प्र. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

अधिक चौकशीसाठी पुढील नंबरवर सपर्क साधा. सौ. नीता सेंजित - ९८९०१६६२८

✳

## परीक्षेतील सुयश

**दहावी**

श्री. अमित नीलेश राणे ८५ टक्के
श्री. जय प्रताप वेलकर,
३७९/५००, ७५.८० टक्के
श्री. निशांत अतुल तळपदे ७० टक्के

**आय जी सी एस इ, आय सी इ (दहावी)**

कु. पलक उन्मेष नायक, प्रथम श्रेणी, विशेष गुणवत्ता

**एच. एस. सी. (बारावी) कॉमर्स**

कु. लवीना सुरेन्द्र चंदुलाल राणे
७३.६९ टक्के

**बी एस सी आय टी**

कु. प्रणाली अतुल तळपदे, प्रथम वर्ग
५०५/८००

**बी. फार्मसी (फायनल)**

श्री. सचेत संजय देसाई

**बी. कॉम.**

कु. रसिका अभय मानकर, 'ए' ग्रेड,

**एम्.कॉम् (फायनल)**

सौ. देवश्री रिषीकेश वेलकर 'ओ' ग्रेड

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67